प्रेमात बुडलेलं बेडूक

मैक्स

मराठी : अश्विनी बर्वे



प्रेमात बुडालेलं बेडूक

मैक्स




मराठी : अश्विनी बर्वे



बेडूक नदीच्या काठी बसलं होतं. त्याला आज काहीसं वेगळंच वाटत होतं..

त्याला हे माहित नव्हतं की तो खुश होता की दुःखी.



तो आठवड्याभर आपल्या स्वप्नातच हरवल्यासारखा फिरत होता.

तो आजारी होता का?





मग त्याची भेट छोट्या डुक्कराशी झाली.

"हॅलो, बेडका," छोट्या डुकराने म्हटलं. "तुझी तब्येत ठीक वाटत नाही. तू बरा आहेस ना?

"मला नाही माहित," बेडूक म्हणालं. "मला एकाच वेळी हसावं आणि रडावं वाटतं आहे. आणि माझ्या आत काहीतरी धकधक चालू आहे.

"तुला सर्दी झाली असेल," छोटं डुक्कर म्हणालं. "तू घरी जाऊन आराम करावा हे चांगलं."

मग बेडूक पुढं गेलं. ते खूप चिंतेत वाटत होतं.



मग ते सश्याच्या घरासमोरून गेलं.

“सशा,” त्यानं म्हटलं, “मला काही बरं वाटत नाही.”

“आत ये आणि बैस,”ससा प्रेमानं म्हणाला.

"अच्छा सांग बरं,“ ससा म्हणाला, “तुला काय त्रास आहे?”

“कधी-कधी मला गरम होतं, आणि कधी-कधी थंड,” बेडूक म्हणालं, “आणि इथं माझ्या आत काहीतरी धकधक होत आहे.”

आणि मग त्याने आपला हात आपल्या छातीवर ठेवला.



सशाने खूप विचार केला, एकदम एका डॉक्टर सारखं.

“बघ,“ तो म्हणाला. “ते तुझं ह्ृदय आहे,” तो म्हणाला. “माझं पण ह्ृदय धकधक करतं आहे.”

“पण माझं ह्ृदय कधीकधी नेहमीपेक्षा अधिक जोरात धडकत आहे,” बेडूक म्हणालं. “ते एक-दोन, एक-दोन करतं.”

सशानं आपल्या कपाटातून एक मोठं पुस्तक काढलं आणि त्याची पानं उलटली.

"अरे!" तो म्हणाला. “जर ह्दयाची धड धड वेगानं होत असेल आणि जर तुला गरम आणि गार वाटत असेल, तर याचा अर्थ तू कोणाच्यातरी प्रेमात आहे.”



"प्रेम," बेडूक आश्चर्यानं म्हणाला.
"वाह! माझं कोणावरतरी प्रेम आहे!”

आणि मग बेडूक इतकं प्रसन्न झालं की ते दरवाज्याच्या बाहेर गेलं आणि त्याने हवेत एक जबरदस्त उडी मारली.



जेव्हा बेडूक अचानक आकाशातून खाली पडलं तेव्हा छोट्या डुक्कराला खूप भीती वाटली.

"तू पहिल्यापेक्षा चांगला दिसत आहे," छोट्या डुकराने म्हटलं.

"मला ठीक-ठाक वाटत आहे," बेडूक म्हणालं – "माझं कोणावर तरी प्रेम आहे."

"ही तर चांगली बातमी आहे. तू कोणाच्या प्रेमात आहे?" छोट्या डुकराने विचारलं.



बेडूक त्याबाबत विचार करण्यासाठी थांबला नाही.

"मला माहित आहे!" तो म्हणाला. "मी प्रेमळ सफेद बदकाच्या प्रेमात आहे!"

"तू असं नाही करू शकत," छोटे डुक्कर म्हणाले. "एक बेडूक एखाद्या बदकावर प्रेम करू शकत नाही. बघ तुझा रंग हिरवा आहे आणि बदकाचा सफेद रंग आहे."

पण बेडकाला त्या गोष्टीची काहीच फिकीर वाटला नाही.



बेडूक लिहू शकत नव्हतं, पण ते सुंदर पेंटिंग करत असे घरी येवून बेडकानं एक सुंदर चित्र काढलं, ज्यात त्यानं आपल्या आवडीच्या लाल आणि निळ्या रंगाचा उपयोग केला.



संध्याकाळी अंधार झाल्यावर ते आपलं पेंटिंग घेवून निघालं आणि त्यानं ते बदकाच्या घराच्या दरवाज्याजवळ ठेवलं. बेडकाचं हृदय उत्साहानं जोरजोरात धडकत होतं.



बदक ते पेंटिंग बघून खूप आश्चर्यचकित झाले.

“मला हे सुंदर पेंटिंग कोण पाठवू शकतं?” ते ओरडत म्हणालं. मग त्याने ते पेंटिंग भिंतीवर लावलं.



दुसऱ्या दिवशी बेडकानं फुलांचा सुंदर गुच्छ केला. तो गुच्छ देण्यासाठी तो बदकाच्या घरी गेला. पण जेव्हा तो बदकाच्या दरवाज्याजवळ पोहचला, तेव्हा त्याला बदकाचा सामना करायची लाज वाटू लागली. म्हणून त्यानं ती फुलं दरवाज्या जवळ ठेवली आणि जितक्या लवकर पळता येईल तेवढ्या लवकर ते तिथून पळालं. आणि मग असंच दिवसेंदिवस चालत राहिलं.

बेडकाला, बद्काशी बोलण्याची हिंमत होत नव्हती.





बदकाला भेटवस्तू मिळत होत्या त्यामुळे ते खूप प्रसन्न होतं. पण त्या भेटी कोण पाठवत होतं?”

बिचारं बेडूक! आता त्याला आपलं जेवण बेचव लागत होतं आणि ते रात्री पण झोपू शकत नव्हतं. अनेक आठवडे असंच चालू राहिलं.



तो बदकाला आपलं प्रेम कसं दाखवणार होता?

“मला असं काही करायला पाहिजे जे आधी कोणी केलेलं नसेल,” बेडकानं ठरवलं.

“मी उंच उडी मारण्याचं जगातलं रेकॉर्ड मोडेन! त्यामुळे बदकाला खूप आश्चर्य वाटेल आणि मग ते माझ्यावर प्रेम करू लागेल.”



बेडकानं लगेच उंच उडी मारण्याचा अभ्यास सुरु केला. त्याने कितीतरी दिवस उंच उडी मारण्याचा अभ्यास केला. त्याने ढगाच्या उंचीइतकी उडी मारली. जगातलं एकाही बेडकानं यापेक्षा अधिक उंच उडी मारली नव्हती.



“बेडकाला काय झालं आहे?” बदकानं काळजीनं विचारलं. “अशा प्रकारे उडी मारणं खूप धोकादायक आहे. त्यामुळे त्याला दुखापत होवू शकतं.”

बदकाचं म्हणणं खरं झालं. शुक्रवारी दुपारी दोन वाजून तेरा मिनिटांनी एक मोठी दुर्घटना झाली.



बेडूक इतिहासातली सगळ्यात उंच उडी मारत होतं, तेव्हा त्याचा तोल गेला आणि धाडकन ते जमिनीवर निपचित पडलं. योगायोगानं बदक त्यावेळी तिथून जात होतं. बदक मदतीसाठी वेगानं धावलं.



बेडूक मोठ्या मुश्किलीनं चालू शकलं. बदकानं त्याला आधार देत आपल्या घरी आणलं. घरी बदकानं खूप प्रेमानं बेडकाची देखभाल केली आणि त्याला चांगलंचुंगलं खाऊ घातलं.

"अरे बेडका, कदाचित तू आज मेला असता!" बदक म्हणालं. याच्यापुढे आता सावध रहा. माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे. "


मग शेवटी बेडकानं पण हिंमत केली.



"मी पण तुझ्यावर खूप प्रेम करतो, प्रिय बदक," बेडूक अस्पष्ट आवाजात म्हणालं. आता त्याचं हृदय पहिल्यापेक्षा अधिक जोरात धडकत होतं आणि त्याचा चेहरा गडद हिरवा झाला होता.

तेव्हापासून बेडूक आणी बदक, दोघं एकदुसऱ्यावर खूप प्रेम करत आहेत. पण बेडकाचा रंग हिरवा आहे आणी बदकाचा एकदम सफेद आहे.

पण प्रेम अशाप्रकारे सीमा आणी बंधनाच्या पलीकडे असतं.



समाप्त